ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज TM
WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 29 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## तृणमूलमधील अंतर्गत युद्ध पोलीस ठाण्यात; ऋतब्रत बॅनर्जीविरोधात तक्रार





पान 3 वरुन...

पिंपरी-चिंचवडच्या पाणीप्रश्नी सरकार 'ॲक्टिव्ह मोड'वर!

### पंतप्रधान मोदींना सेशेल्सचा सर्वोच्च नागरी सन्मान 'गार्डियन ऑफ द ब्लू होराइजन'

# मोदींचा जागतिक गौरव!

महाईन्यूज ।
नवी दिल्ली

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सेशेल्सचा सर्वोच्च सन्मान गार्डियन ऑफ द ब्लू होरायझन पुरस्कार प्रदान केला आहे. पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासातील कामगिरीसाठी सेशेल्सने हा सर्वोच्च सन्मान दिला असून, यामध्ये हवामान कृती (क्लायमेट ॲक्शन), हरित विकास (ग्रीन ग्रोथ) आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी त्यांच्या प्रयत्नांची दखल घेण्यात आली आहे. शाश्वत विकास, पर्यावरण संरक्षण आणि ब्लू इकॉनॉमी (सागरी अर्थव्यवस्था) बद्दलच्या दीर्घकालीन कामाची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला आहे.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळालेल्या मानपत्रात लहान विकसनशील देशांना त्यांनी दिलेला पाठिंबा, हवामान लवचिकता, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि महासागराच्या संसाधनांचे जबाबदार व्यवस्थापन या बाबींचा गौरव करण्यात आला आहे. तसंच यातून भारत आणि सेशेल्समधील दृढ होत चाललेल्या भागीदारीवरही प्रकाश टाकण्यात आला आहे.

या बहुमानाबद्दल भावना व्यक्त करताना पंतप्रधान मोदींनी एक्सवर एका पोस्टमध्ये म्हटलं, "गार्डियन ऑफ द ब्लू होरायझन पुरस्कार स्वीकारताना मला अत्यंत नम्र वाटत आहे. मी हा किताब आदराने स्वीकारतो आणि तो अशा सर्व देशांना समर्पित करतो जे हवामान बदलाच्या आव्हानांशी लढा देत आहेत आणि पर्यावरणाचे रक्षण करणे ही भावी पिढ्यांप्रती आपली जबाबदारी मानतात."

हवामान कृती, शाश्वत विकास आणि हरित विकासातील योगदानासाठी पंतप्रधान मोदींना मिळालेल्या जागतिक सन्मानांच्या मालिकेतील हा नवीनतम पुरस्कार आहे. मे २०२६मध्ये अन्न आणि कृषी संघटनेने (FAO) त्यांना अन्न सुरक्षा बळकट करण्यासाठी, कृषी क्षेत्रात बदल घडवण्यासाठी आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी ॲग्रिकोला मेडल (AGRICOLA MEDAL) प्रदान केलं होतं. तर, २०१८ मध्ये शाश्वत आर्थिक विकास, जागतिक सहकार्य आणि सर्वसमावेशक विकासाला चालना दिल्याबद्दल त्यांना 'सोल शांतता पुरस्कार' (SEOUL PEACE PRIZE) मिळाला.

२०१८ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी (UN) त्यांना हवामान कृती आणि आंतरराष्ट्रीय पर्यावरण सहकार्याला चालना देण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाची दखल घेत चॅम्पियन्स ऑफ द अर्थ (CHAMPIONS OF THE EARTH AWARD) या संस्थेच्या सर्वोच्च पर्यावरण सन्मानाने गौरविलं. सेशेल्सकडून मिळालेला हा नवा बहुमान पंतप्रधान मोदींच्या आंतरराष्ट्रीय सन्मानांच्या वाढत्या यादीत भर घालणारा असून, पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि हवामान कृतीसाठी त्यांच्या जागतिक स्तरावरील प्रयत्नांना अधोरेखित करतो.

## प्रमुख देशांचे सर्वोच्च नागरी पुरस्कार

- सेशेल्स (२०२६): गार्डियन ऑफ द ब्लू होरायझन (पर्यावरण आणि सागरी अर्थव्यवस्थेसाठी)
- इथिओपिया (२०२५): द ग्रेट ऑनर निशान ऑफ इथिओपिया
- नामिबिया (२०२५): ऑर्डर ऑफ द मोस्ट एन्शियंट वेलविट्सकिया मिराबिलिस
- ब्राझील (२०२५): ग्रँड कॉलर ऑफ द नॅशनल ऑर्डर ऑफ द साउदर्न क्रॉस
- घाना (२०२५): ऑफिसर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार ऑफ घाना
- कुवेत्र (२०२४): ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर
- गयाना (२०२४): ऑर्डर ऑफ एक्सलन्स
- डोमिनिका (२०२४): डोमिनिका अवॉर्ड ऑफ ऑनर
- नायजेरिया (२०२४): ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नाइजर
- रशिया (२०२४): ऑर्डर ऑफ सेंट अँड्रयू द अपोस्टल
- भूतान (२०२४): ऑर्डर ऑफ द ड्रुक ग्यालपो
- ग्रीस (२०२३): ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ ऑनर
- फ्रांस (२०२३): ग्रँड क्रॉस ऑफ द लीजन ऑफ ऑनर
- इजिप्त (२०२३): ऑर्डर ऑफ द नाईल
- पापुआ न्यू गिनी (२०२३): ग्रँड कम्पॅनियन ऑफ द ऑर्डर ऑफ लोगोहू
- फिजी (२०२३): कम्पॅनियन ऑफ द ऑर्डर ऑफ फिजी
- पलाऊ (२०२३): एबाकल अवॉर्ड
- अमेरिका (२०२०): लीजन ऑफ मेरिट (चीफ कमांडर)
- बहरीन (२०१९): किंग हमाद ऑर्डर ऑफ द रेनेसां
  संयुक्त अरब अमिराती - UAE (२०१९): ऑर्डर ऑफ झायेद
- मालदीव (२०१९): ऑर्डर ऑफ द डिस्टिंग्विश्ड रुल ऑफ निशान इझुद्दीन
- पॅलेस्टाईन (२०१८): ग्रँड कॉलर ऑफ द स्टेट ऑफ पॅलेस्टाईन
- अफगाणिस्तान (२०१६): स्टेट ऑर्डर ऑफ गाझी अमीर अमानुल्ला खान
- सौदी अरेबिया (२०१६): ऑर्डर ऑफ किंग अब्दुलअजीज अल सौद

# पुण्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची फसवणूक

## फसवणूक झाल्यानंतर शिवाजीनगर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्याच्या कोथरूडमध्ये पौड फाटा परिसरातील एक ज्येष्ठ नागरिक. वय वर्षे ७०! तीन महिन्यांपूर्वी त्यांच्या मोबाइलवर फोन आला. शेअर बाजारात गुंतवणूक करण्याच्या संधींची सविस्तर माहिती दिली. आणि, 'गुंतवणूक केली, तर उत्तम परतावा मिळेल,' असेही बोलणाऱ्याने सांगितले. विश्वास ठेवून ज्येष्ठ नागरिकाने तसे केलेही. आधी परतावा मिळाल्याचे भासवले गेले. नंतर लक्षात आले, की प्रत्यक्षात फसवणूक झाली आहे.**




शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने कोथरूड भागातील एका ज्येष्ठ नागरिकाची एक कोटी दहा लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा हा प्रकार नुकताच उघडकीस आला. या प्रकरणी सायबर पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने शिवाजीनगर येथील सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ७० वर्षीय ज्येष्ठ नागरिक हे सेवानिवृत्त झाले आहेत. पौड फाटा परिसरातील एका सोसायटीत ते राहतात. एप्रिल महिन्यात सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले. त्यानंतर चोरट्यांनी शेअर बाजारात विविध गुंतवणूक योजना, तसेच मिळणाऱ्या परताव्याची माहिती त्यांना दिली. चोरट्याच्या आमिषाला ते बळी पडले.

त्यानंतर चोरट्याच्या बँक खात्यात त्याने गेल्या तीन महिन्यांत वेळोवेळी एक कोटी दहा लाख रुपये जमा केले. पैसे जमा केल्यानंतर चोरट्यांनी त्यांना संदेश पाठविला. परतावा जमा झाल्याचे भासविले. मात्र, प्रत्यक्षात परतावा बँक खात्यात जमा करण्यात आला नव्हता. ज्येष्ठ नागरिकाने चोरट्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. तेव्हा फसवणूक झाल्याचे उघडकीस आले.

पुणे शहरात एकूणच गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणुकीच्या घटना वाढत आहेत एका डॉक्टर महिलेलाही अशाच प्रकारे नुकताच गंडा घालण्यात आला. फसव्या योजना आणि कॉलपासून सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. सायबर गुन्हेगार आता आकर्षक परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांना लक्ष्य करत असल्याने प्रत्येकाने सतर्क राहणे अत्यंत गरजेचे आहे. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून किंवा पडताळणी न करता मोठी आर्थिक गुंतवणूक करू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. संशयास्पद कॉल, मेसेज किंवा गुंतवणूक ऑफर मिळाल्यास त्वरित सायबर हेल्पलाइन 1930 किंवा जवळच्या सायबर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

### सिनीअर सिटीझन कार्ड

बँककडून ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र देण्यात येणार असल्याची बतावणी करून सायबर चोरट्यांनी एका ज्येष्ठ नागरिकाची दहा लाख ३४ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ७५ वर्षीय ज्येष्ठ नागरिक एरंडवणे भागात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधून बँकेतून बोलत असल्याची बतावणी केली. ज्येष्ठ नागरिकांना बँककडून ओळखपत्र देण्यात येणार असल्याची बतावणी करून चोरट्यांनी त्यांच्या बँक खात्याची माहिती घेतली.

# अ‍ॅट्रॉसिटी पीडित कुटुंबांना राज्य शासनाकडून मोठा दिलासा

**महाईन्यूज । पुणे**

**राज्यातील अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (अ‍ॅट्रॉसिटी) ज्या घटनांमध्ये पीडित व्यक्तीचा मृत्यू झाला आहे, अशा प्रकरणांतील वारसांना आता शासकीय सेवेत सामावून घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय समाज कल्याण विभागाने घेतला आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून न्यायाच्या आणि रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेल्या पीडित कुटुंबांना मोठा आधार मिळणार असून, गेल्या सहा महिन्यांत राज्यातील ४६९ पीडित कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.**




अ‍ॅट्रॉसिटी कायद्यानुसार पीडित कुटुंबांना आर्थिक मदत दिली जातेच, परंतु कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या निधनानंतर त्यांच्यावर कोसळलेले आर्थिक संकट दूर करण्यासाठी नोकरी देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. समाज कल्याण विभागाच्या माध्यमातून अशा प्रकारच्या वारसांची माहिती संकलित करण्यात आली असून, त्यांना समाजकल्याण कार्यालयामार्फत गट ड संवर्गातील पदावरच नियुक्ती दिली जाणार आहे.

अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत नोंद झालेल्या ज्या गुन्ह्यांमध्ये पीडित व्यक्तीचा मृत्यू झाला आहे, अशा प्रकरणांमध्ये पीडिताच्या रक्ताच्या नात्यातील एका वारसाला शासकीय नोकरी देण्यात येणार आहे. संबंधित वारसाच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांची 'वर्ग-3' किंवा 'वर्ग-4' पदावर नियुक्ती केली जाईल. ही संपूर्ण प्रक्रिया संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग आणि जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयातून राबविण्यात येत आहे.'

पीडित कुटुंबांना न्याय मिळवून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. अ‍ॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत ज्या घटनांमध्ये पीडित व्यक्तीचा मृत्यू झाला आहे, अशा प्रकरणांतील वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय नोव्हेंबर 2025 मध्ये घेण्यात आला.

### ९१ जणांना नोकरी

राज्यात अनेक ठिकाणी अशा प्रकारच्या नोकरीच्या मागण्या प्रलंबित होत्या. शासनाच्या या निर्णयामुळे केवळ आर्थिक मदतच नाही, तर सामाजिक सुरक्षितताही प्रदान केली जाणार आहे. पुणे विभागातही या प्रकरणांचा आढावा घेऊन पात्र उमेदवारांच्या नियुक्ती प्रक्रियेला वेग आला आहे. पुणे विभागातील सांगली 25, सातारा 50, सोलापूर 36, कोल्हापूर 22, तर पुणे जिल्ह्यातून 113 अशी तब्बल 246 प्रकरणे आली असून, 232 प्रकरणे प्रलंबित आहेत.

# पिंपरी-चिंचवडच्या पाणीप्रश्नी सरकार 'ॲक्टिव्ह मोड'वर!

## महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश; ३० जूनला जलसंपदा मंत्र्यांची संयुक्त आढावा बैठक




### दीर्घकालीन जलसुरक्षेकडे महत्त्वाचे पाऊल

पिंपरी-चिंचवडच्या वाढत्या लोकसंख्येला भविष्यात पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आंद्रा धरणातून अतिरिक्त १ टीएमसी, ठोकरवाडी धरणातून सुमारे ५ टीएमसी पाणी आरक्षणासह विविध प्रस्तावांवर ३० जून रोजी जलसंपदा विभागाची संयुक्त आढावा बैठक होणार आहे. तसेच ३ जुलै रोजी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पवना थेट पाइपलाइन प्रकल्पाचा आढावा घेतला जाणार असून, शहराच्या दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी हे दोन्ही निर्णय महत्त्वपूर्ण मानले जात आहेत.

“पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक विस्तार लक्षात घेता भविष्यातील पाणीपुरवठ्याचे नियोजन आजच करणे आवश्यक आहे. शहराला दीर्घकालीन जलसुरक्षा मिळावी यासाठी विविध पाणी आरक्षण प्रस्ताव शासनाकडे मांडले आहेत. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागांची संयुक्त आढावा बैठक बोलावण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीतून ठोस निर्णय होऊन शहरातील नागरिकांना भविष्यात पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करणार आहोत.

- रविना आंगोळकर,
सभापती, शिक्षण समिती.

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागांची संयुक्त आढावा बैठक घेण्याचे निर्देश दिले आहेत. विधानसभा पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी विखे-पाटील यांची भेट घेऊन शहरासाठी प्रस्तावित पाणी आरक्षण प्रस्तावांबाबत सविस्तर निवेदन सादर केले.**

यावेळी आमदार लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि भविष्यातील वाढती पाण्याची गरज याकडे लक्ष वेधले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अंदाजानुसार सन २०४१ पर्यंत शहराची लोकसंख्या सुमारे ९६ लाखांपर्यंत पोहोचणार असल्याने दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी तातडीने नियोजन करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

निवेदनात आंद्रा धरणातून अतिरिक्त १ टीएमसी पाणी आरक्षण, ठोकरवाडी धरणातून सुमारे ५ टीएमसी पाणी उपलब्ध करून देणे या प्रस्तावांचा समावेश आहे. या प्रस्तावांचा एकत्रित विचार करून भविष्यातील पाणी गरजांचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी जलसंपदा विभाग, पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन आणि संबंधित तांत्रिक यंत्रणांची संयुक्त बैठक आयोजित करण्याची मागणी आमदार लांडगे यांनी केली होती.

त्यावर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत येत्या मंगळवारी, दि. ३० जून २०२६ रोजी संबंधित विभागांची आढावा बैठक घेण्याचे निर्देश दिले आहेत. या बैठकीत विविध पाणी आरक्षण प्रस्तावांच्या तांत्रिक, प्रशासकीय आणि धोरणात्मक बाबींवर सविस्तर चर्चा होणार आहे. शहरातील लाखो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण असून, भविष्यातील पाणीपुरवठा नियोजनासाठी ती निर्णायक ठरणार आहे.

विशेष म्हणजे, शहराच्या पाणी पुरवठ्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा पवना थेट पाईपलाईन प्रकल्पाबाबतही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये दि. ३ जुलै २०२६ रोजी सविस्तर आढावा बैठक होणार आहे.

# पाणीकपातीपेक्षा 'अवेळी' पाणीपुरवठ्याने नागरिक हैराण!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरात १५ टक्के पाणीकपातीची अंमलबजावणी करताना अनेक भागांतील पाणीपुरवठ्याच्या वेळाही बदलल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. काही भागात मध्यरात्री, काही ठिकाणी पहाटे तर काही परिसरात दुपारच्या वेळेत पाणी सोडले जात असल्याने हजारो नागरिकांचे दैनंदिन नियोजन विस्कळीत झाले आहे.**



धरणांतील पाणीसाठा कमी झाल्याचे कारण देत महापालिकेने शहरात १५ टक्के पाणीकपात लागू केली आहे. मात्र, केवळ पाणीपुरवठ्याचा कालावधी कमी करण्याऐवजी अनेक भागांतील वेळाच बदलल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. पाणीकपात मान्य असली, तरी अवेळी पाणीपुरवठा कोणत्या निकषावर केला जात आहे, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

महापालिकेच्या नव्या वेळापत्रकानुसार अजमेरा कॉलनी, मासुळकर कॉलनी, वास्तू उद्योग आणि उद्यमनगर परिसरात मध्यरात्री १ वाजता पाणीपुरवठा होणार आहे. नवी सांगवीतील गणेशनगर, समर्थनगर आणि ट्रू शाळा परिसरात पहाटे ४.३० ते ६.३० या वेळेत, तर तानाजीनगरमध्ये दुपारी ३.३० ते सायंकाळी ६.३० या वेळेत पाणीपुरवठा केला जाणार आहे.

या बदलामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती तसेच नोकरी करणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. मध्यरात्री पाणी भरण्यासाठी जागरण करावे लागत असून, पहाटेच्या वेळेमुळे झोपमोड होत आहे. दुपारच्या वेळेत घरात कोणी नसल्यास पाणी भरणार कोण, असा प्रश्न अनेक कुटुंबांसमोर उभा राहिला आहे. सार्वजनिक नळांवर वाद निर्माण होण्याचीही शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नागरिकांचा आक्षेप केवळ पाणीकपातीवर नसून निर्णयाच्या प्रक्रियेवर आहे. एवढा मोठा बदल करण्यापूर्वी नागरिक, गृहनिर्माण संस्था किंवा स्थानिक लोकप्रतिनिधींशी कोणतीही चर्चा करण्यात आली नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. तसेच पाणीपुरवठ्याच्या वेळा बदलण्यामागील निकष आणि कारणे महापालिकेने स्पष्ट न केल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन महापालिकेकडून करण्यात येत असले, तरी पाणीपुरवठ्याच्या अवेळी वेळांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे महापालिकेने नव्या वेळापत्रकाचा फेरविचार करून नागरिकांना सोयीस्कर वेळेत पाणीपुरवठा करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### अवेळी पाणी-पुरवठ्याने वाढली गैरसोय

१५ टक्के पाणीकपातीसोबतच अनेक भागांतील पाणीपुरवठ्याच्या वेळा बदलल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. काही ठिकाणी मध्यरात्री, काही भागात पहाटे तर काही परिसरात दुपारच्या वेळेत पाणीपुरवठा होत असल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक, नोकरी करणारे चाकरमानी आणि विद्यार्थ्यांचे दैनंदिन नियोजन विस्कळीत झाले आहे. पाणीकपात मान्य असली, तरी नागरिकांशी कोणताही संवाद न साधता वेळा बदलल्याने महापालिकेच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# होर्मुझचा धडा; ऊर्जा सुरक्षेसाठी ठोस पावले गरजेची



**भूमिका**

**फेब्रुवारीच्या अखेरीस सुरू झालेला आखातातील संघर्ष शंभरहून अधिक दिवसांनंतर तात्पुरता शांत झाला असला, तरी या संकटाने भारताच्या ऊर्जा सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता करारामुळे होर्मुझ सामुद्रधुनीवरील निर्बंध हटले आणि तेल, नैसर्गिक वायू तसेच खतांची वाहतूक पुन्हा सुरू झाली.**



मात्र, या घटनेने भारताचे होर्मुझवरील मोठे परावलंबित्व पुन्हा एकदा अधोरेखित केले. जागतिक ऊर्जा पुरवठ्याच्या दृष्टीने होर्मुझ सामुद्रधुनी ही अत्यंत महत्त्वाची सागरी वाहतूक मार्गिका आहे. आखातातील बहुतांश कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू याच मार्गाने आशियाई देशांपर्यंत पोहोचतो. या मार्गात कोणताही अडथळा निर्माण झाला, तर त्याचे परिणाम थेट जागतिक अर्थव्यवस्थेवर आणि विशेषतः आयातदार देशांवर होतात. भारत हा आपल्या गरजेपैकी सुमारे ८० टक्के कच्चे तेल आयात करणारा देश असून, त्यातील मोठा हिस्सा आखाती देशांकडून येतो. त्यामुळे होर्मुझमधील कोणताही तणाव भारतासाठी चिंतेचा विषय ठरतो.

या संघर्षादरम्यान आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमतींमध्ये मोठी वाढ झाली. तेल महागले की भारताचे आयात बिल वाढते, महागाईचा दबाव निर्माण होतो, परकीय चलनावर ताण येतो आणि अर्थव्यवस्थेवरील ओझे वाढते. याशिवाय युरिया, अमोनिया, सल्फर आणि बिटुमनसारख्या महत्त्वाच्या वस्तूंच्या आयातीलाही फटका बसू शकतो. त्यामुळे ऊर्जा सुरक्षेकडे केवळ आर्थिक नव्हे, तर राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

या पार्श्वभूमीवर भारताने तीन महत्त्वाच्या आघाड्यांवर प्राधान्याने काम करणे आवश्यक आहे. पहिले म्हणजे तेल आयातीचे विविधीकरण. रशिया, अमेरिका, ब्राझील, व्हेनेझुएला आणि आफ्रिकेतील देशांकडून आयात वाढवून एका प्रदेशावरील अवलंबित्व कमी करणे गरजेचे आहे. दुसरे म्हणजे धोरणात्मक तेलसाठा वाढविणे. सध्या असलेली साठवणूक क्षमता दीर्घकालीन संकटाचा सामना करण्यासाठी अपुरी आहे. तिसरे म्हणजे होर्मुझला पर्यायी वाहतूक मार्ग विकसित करणे आणि भारत-मध्य पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉरसारख्या प्रकल्पांना गती देणे.

यासोबतच भारतीय नौदलाची सागरी उपस्थिती अधिक मजबूत करणे, सागरी पुरवठा साखळी सुरक्षित ठेवणे आणि इलेक्ट्रिक वाहने, इथेनॉल मिश्रण तसेच अक्षय ऊर्जेचा वापर वाढविणेही तितकेच महत्त्वाचे आहे. ऊर्जा क्षेत्रातील आत्मनिर्भरता हीच भविष्यातील सर्वात मोठी सुरक्षा ठरणार आहे. या संघर्षातून संरक्षण क्षेत्रालाही महत्त्वाचा धडा मिळाला आहे. आधुनिक युद्धांमध्ये ड्रोन तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक संरक्षण प्रणालींचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे स्वदेशी संरक्षण उत्पादन, ड्रोनविरोधी यंत्रणा आणि आधुनिक तंत्रज्ञानात सातत्याने गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

होर्मुझमधील संकट तात्पुरते निवळले असले, तरी भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती होणार नाही, याची खात्री देता येत नाही. म्हणूनच ऊर्जा सुरक्षेला राष्ट्रीय प्राधान्य देत तेल आयातीचे विविधीकरण, मोठा धोरणात्मक साठा, पर्यायी वाहतूक मार्ग, मजबूत सागरी सुरक्षा आणि स्वदेशी संरक्षण क्षमता या पाची क्षेत्रांत भारताने तातडीने ठोस पावले उचलणे हीच काळाची गरज आहे.

## प्रासंगिक »

### वक्ता आणि श्रोते

**एका गावात एक विद्वान वक्ता महत्त्वाच्या विषयावर व्याख्यान देत होता. मात्र, श्रोत्यांचे त्याकडे अजिबात लक्ष नव्हते. काहीजण गप्पा मारत होते, तर काहींचे लक्ष इतरत्र होते.**

श्रोत्यांचे लक्ष वेधण्यासाठी वक्त्याने एक गोष्ट सुरू केली. तो म्हणाला, "एक देव, एक पाणसर्प आणि एक चिमणी प्रवासाला निघाले. वाटेत नदी आली. चिमणी उडून गेली, पाणसर्प पोहत गेला..." इतके सांगून वक्त्याने पुन्हा भाषण सुरू केले.

अपूर्ण गोष्ट ऐकून श्रोते अस्वस्थ झाले आणि देवाचे पुढे काय झाले, अशी विचारणा करू लागले. वक्ता हसून म्हणाला, "देव नदी पार करू शकत होता; पण तो अशा लोकांचा विचार करत नदीकिनारी थांबला आहे, ज्यांना महत्त्वाच्या विषयांपेक्षा मनोरंजक गोष्टींचीच अधिक आवड असते." हे ऐकताच श्रोत्यांना आपली चूक उमगली. त्यांनी शांतपणे उर्वरित व्याख्यान ऐकले आणि त्यातील विचार आत्मसात केले.

- तात्पर्य : लोकहिताचे विचार प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी कधी कधी योग्य युक्ती आणि संवादकौशल्याचा वापर करावा लागतो.

लोहगडावरील हत्या प्रकरणाने संपूर्ण राज्याला हादरवून सोडले आहे. प्रथमदर्शनी अपघात वाटणाऱ्या या घटनेमागे पूर्वनियोजित कट असल्याचे समोर आल्यानंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# सियाचा निर्णय; एका जीवासह तीन संसारांचा अंत

लग्न ठरलेला तरुण, त्याची होणारी पत्नी आणि तिचा प्रियकर या त्रिकोणातून उलगडलेली ही घटना केवळ एका हत्येची कथा नाही; तर ती समाजातील बदलत्या मानसिकतेचे आणि नातेसंबंधांतील संवादाच्या अभावाचे गंभीर चित्र आहे.

प्रेम, विवाह आणि वैयक्तिक स्वातंत्र्य याबाबत आजची पिढी पूर्वीपेक्षा अधिक स्पष्ट आणि स्वतंत्र आहे. प्रत्येक व्यक्तीला आपल्या आयुष्याचा जोडीदार निवडण्याचा अधिकार आहे. एखादे लग्न मान्य नसेल, तर ते नाकारण्याचाही तितकाच अधिकार आहे. मात्र, मतभेद किंवा कौटुंबिक दबाव यावर उपाय म्हणून हिंसा स्वीकारली जाते, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. कोणतीही परिस्थिती माणसाचा जीव घेण्याचे समर्थन करू शकत नाही.

या प्रकरणात सर्वाधिक वेदनादायक बाब म्हणजे हा निर्णय क्षणिक रागातून घेतलेला नसून त्यासाठी नियोजन करण्यात आल्याचा आरोप आहे. म्हणजेच संवाद, समजूत



किंवा कायदेशीर मार्ग यांऐवजी गुन्ह्याचा पर्याय निवडला गेला. त्याचा परिणाम एका निष्पाप तरुणाचा मृत्यू, दोन तरुणांचे उद्ध्वस्त आयुष्य आणि तीन कुटुंबांच्या अपरिमित दुःखात झाला. प्रतिष्ठा, सामाजिक दबाव किंवा वैयक्तिक भावना यापैकी कोणतीही गोष्ट मानवी जीवनापेक्षा मोठी असू शकत नाही.

अलीकडील काही घटनांमध्ये प्रेमसंबंध, विवाह किंवा कौटुंबिक मतभेद यांमधून घडणाऱ्या गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण वाढताना दिसते. सोशल मीडियाच्या प्रभावामुळे नात्यांचे बाह्य प्रदर्शन वाढले असले, तरी परस्पर विश्वास, संवाद आणि संयम यांची उणीवही प्रकर्षाने जाणवते. मतभेद निर्माण झाल्यास त्यावर चर्चा करण्याऐवजी टोकाची भूमिका घेण्याची प्रवृत्ती समाजासाठी धोकादायक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर पालक, तरुण पिढी आणि समाज या तिन्ही घटकांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. पालकांनी मुलांच्या इच्छेला महत्त्व देणे, तर तरुणांनी आपल्या भावना स्पष्टपणे मांडणे आणि कोणत्याही दबावाला बळी न पडता कायदेशीर व शांततापूर्ण मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे. नात्यांमध्ये विश्वास आणि संवाद यांना पर्याय नाही.

लोहगड हत्या प्रकरणाचा अंतिम निर्णय न्यायालय देईल. तपासातून आणखी अनेक पैलू समोर येतील. मात्र, या घटनेने दिलेला संदेश स्पष्ट आहे— मतभेद, प्रेमभंग किंवा सामाजिक दबाव यांचे उत्तर हिंसा कधीच असू शकत नाही. नातेसंबंध टिकविण्यासाठी संवाद, परस्पर आदर आणि विवेक हीच खरी मूल्ये आहेत. अन्यथा अशा घटना केवळ व्यक्तींचे नव्हे, तर समाजाच्या नैतिकतेचेही अपरिमित नुकसान करत राहतील.

## ।। अभंगवाणी ।।



बहुतांच्या आम्ही न मिळो मतासी ।
कोणी कैसी कैसी भावनेच्या ॥१॥

विचार करितां वांयां जाय काळ ।
लटिकें तें मूळ फजितीचें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गद्दाराला उमेदवारी दिली, जाहीर माफी मागतो

## उद्धव ठाकरेंचा ओमराजे निंबाळकरांबाबत मोठा गौप्यस्फोट; जोरदार टीका

**महाईन्यूज । धाराशिव**

**मला ओमराजे हवे होते, त्यांना खासदार हवा होता. मी माणसं जपणारा माणूस आहे. खासदार हे निवडणुकीत येतात आणि जातात, पण माणूस जपला पाहिजे. मी शेवटच्या क्षणापर्यंत त्यांना जपण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी गद्दारी केली. अशा एका गद्दाराला उमेदवारी दिली याबद्दल मी तुमची जाहीर माफी मागतो," अशा अत्यंत भावनिक आणि तितक्याच आक्रमक शब्दांत शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर थेट हल्लाबोल केला.**



धाराशिव येथील जाहीर सभेत ते बोलत होते. गद्दारीला आता अजिबात थारा द्यायचा नाही, असे आवाहन करत ओमराजे गद्दारीचा शिक्का कसा पुसणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

"शिवसेनेचे पाच खासदार फुटले होते. दोन तृतीयांश खासदारांचा आकडा गाठण्यासाठी त्यांना आणखी एकाची गरज होती. याचाच फायदा घेत ओमराजे निंबाळकर यांनी स्वतःचा भाव वाढवून घेतला, असा आरोप करत जोपर्यंत माझ्यात जीव आहे, तोपर्यंत उद्धव ठाकरे तुमच्यासोबतच राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

"तुम्हाला मंदिर बांधायचे नव्हते, तर लुटायचे होते. आताची भाजप ही जुनी राहिलेली नाही, ती नवीन भाजप असून 'बाबर जनता पार्टी' झाली आहे. तुमच्यात आणि बाबरी मानसिकतेत आता काय फरक उरला आहे? आम्ही छत्रपती शिवरायांचे आणि शेतकऱ्याला हक्काचा दाम देणारे खरे हिंदुत्व मानतो," असा पुन्हरुच्चारही त्यांनी केला. शिवसेना (ठाकरे) पक्षाचे सहा खासदार फुटण्याच्या आधी बोलावलेल्या बैठकीत नेमकं काय घडलं होतं? कोणत्या खासदाराने बैठकीला उपस्थित न राहण्यासाठी काय कारणं सांगितली होती? याबाबतही उद्धव ठाकरे यांनी खुलासा केला आहे.

### उद्धव ठाकरे काय म्हणाले?

हा गद्दार तिकडे गेला. मी त्याला धाराशिवच्या जनतेचा उमेदवार म्हणून दिलं होतं. पण याची मला आता लाज वाटते. हा सगळा फसवणुकीचा कारभार सुरू आहे. आता यांचे जे काही रिल्स येत आहेत, एका विमानात परभणीचा एकजण, हिंगोलीचा एकजण, यवतमाळचा एकजण आणि धाराशिवचा एकजण. हे चार्टर्ड विमानाने फिरतात, कोणी दिले एवढे पैसे? आई तुळजाभवानीच्या जिल्ह्यात ही गद्दारी झालेली आहे. आता गद्दारांनी जे काही विकासाच्या निधीचं कारण सांगितलं आहे, ते तुमच्यासाठी नाही. हा विकासनिधी जनतेसाठी नाही, तर त्यांच्या स्वार्थासाठी आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

### भाजपमध्ये अंतर्गत कलह

भाजपच्या अंतर्गत राजकारणावर भाष्य करताना उद्धव ठाकरे यांनी मोठा दावा केला. "कदाचित देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री राहणार नाहीत, त्यांच्याविरुद्ध पक्षातच षडयंत्र चालू आहे. आता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदावरून गेले तरी मला आश्चर्य वाटणार नाही. नितीन गडकरी हे दुसऱ्या टर्मला असताना मुद्दामून त्यांच्या भानगडी काढल्या गेल्या. फडणवीस यांना संपवण्यासाठीच ही सगळी गद्दारी घडवून आणण्यात आली आहे. म्हणूनच हे सहा खासदार भाजपमध्ये थेट गेले नाहीत, असा दावाही उद्धव ठाकरे यांनी केला. धाराशिव येथील जाहीर सभेत ते बोलत होते.

## नाशिक-पुणे रेल्वेमार्गासाठी मुख्यमंत्र्यांकडे लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळ नेणार

**महाईन्यूज । अकोले**

**नाशिक-पुणे जलदगती रेल्वेमार्ग संगमनेर-देवठाण मार्गे न्यावा ही आपली आग्रही मागणी कायम असून, सर्व लोकप्रतिनिधीना घेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी तालुक्यातील देवठाण येथील कार्यक्रमात बोलताना सांगितले.**



### आरोपीचं पुणे कनेक्शन?

ज्या अकोले तालुक्याने उत्तर अहिल्यानगर जिल्हा समृद्ध केला त्या तालुक्यातील पाणी टंचाई दूर करणे, हे सरकारचे कर्तव्य आहे. बिताका प्रकल्पाच्या बाबतीत २० लाख रुपयांचा निधी सर्व्हे करण्यासाठी दिला होता. बिताकामध्ये पाणी आणण्यासाठी आवश्यक असलेला ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याची ग्वाही त्यांनी दिली. आढळा धरणाचे मजबूतीकरण तसेच गाळ काढून धरणात अतिरिक्त पाणी निर्माण करण्यासाठी जलसंपदा विभाग सर्वतोपरी सहकार्य करेल तसेच जलसंधारण विभागाकडे असलेले बंधारे जलसंपदा विभागाकडे वर्ग करून त्यासाठी निधी देण्याची ग्वाही मंत्री विखे यांनी दिली. आमदार लहामटे, अशोकराव शेळके यांची भाषणे झाली.

प्रधानमंत्री कुसुम सौरऊर्जा आणि मागेल त्याला सौरपंप योजनेतून अकोले तालुक्यातील ८२१ शेतकऱ्यांना सौरपंप उपलब्ध झाल्याची माहिती त्यांनी या वेळी दिली. वीज वितरण कंपनीच्या माध्यमातून सुमारे ६ कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात येणाऱ्या उपकेंद्राच्या कामाचे भूमीपुजन तसेच जलयुक्त शिवार अभियान-२ अंतर्गत देवठाण येथील बंधारा कामाचा शुभारंभ मंत्री विखे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. आमदार डॉ. किरण लहामटे, भाजपचे जेष्ठ नेते सिताराम भांगरे, शिवाजी धुमाळ, रावसाहेब वाकचौरे, अशोकराव शेळके सुधाकरराव देशमुख, सरपंच विजया सहाणे, प्रांताधिकारी अरूण उंडे, जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, वीज वितरण कंपनीचे अभियंता प्रदीप वट्टमवार आदी उपस्थित होते.

मंत्री विखे म्हणाले की, येत्या सहा महिन्यात उपकेंद्राचे काम पूर्ण होईल. राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीजपुरवठा व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सौरऊर्जेचे धोरण घेतले असून, भारनियमन मुक्त महाराष्ट्र करण्याच्या दिशेने राज्य वाटचाल करीत आहे.

जिल्ह्यात पारनेर, संगमनेर आणि राहाता तालुक्यात सौर उर्जा प्रकल्पाची काम मार्गी लागल्याने या भागातील शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होत आहे. महायुती सरकारने जाहिरनाम्यात दिलेल्या वचनाची ही पूर्तता असल्याचे मंत्री विखे यांनी सांगितले. सौरपंप उत्पादन जेवढे झाले त्यापैकी सर्वाधिक पंप राज्यात बसवले गेले आहेत. रोहित्रांची क्षमता वाढविण्याची मागणी मोठ्या प्रमाणात आहे. सौरउर्जा प्रकल्पामुळे वीजटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी सुटेल. कोल्हापूर जिल्ह्याप्रमाणे नदीकाठच्या गावांना सौरऊर्जा योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सर्व्हे करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

# ३० दिवस 'हॉर्मुझ सामुद्रधुनी' नियंत्रित ठेवणार

## हॉर्मुझ सामुद्रधुनीवर केवळ इराणचेच नियंत्रण इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांचा असल्याचा पुन्नरुच्चार

**महाईन्यूज । इराण**

**'स्टेट ऑफ हॉर्मुझ' (हॉर्मुझची सामुद्रधुनी) पुढील ३० दिवस पूर्णपणे इराणच्या नियंत्रणाखाली राहील. कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप किंवा एकतर्फी कारवाई केल्यास ही सामुद्रधुनी पुन्हा खुली होण्यास उशीर होईल, असा इशारा इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी आज (दि.२८) दिला.**



बगदाद येथे इराकी परराष्ट्र मंत्र्यांसोबत घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत अराघची म्हणाले, "हॉर्मुझची सामुद्रधुनी पुढील ३० दिवस पूर्णपणे इराणच्या देखरेखीखाली आणि व्यवस्थापनाखाली राहील. सर्व अडथळे दूर झाल्यानंतर या जलमार्गाची पूर्ण क्षमता पूर्ववत केली जाईल."

धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या हॉर्मुझ सामुद्रधुनीवरील इराणच्या नियंत्रणाला आव्हान देण्याचा कोणताही प्रयत्न झाल्यास तणाव आणखी वाढेल. मध्यपूर्वेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न सुरू असतानाच त्यांनी हा इशारा दिला आहे. "इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणकडून सध्या सुरू असलेल्या व्यवस्थेव्यतिरिक्त नवीन किंवा वेगळी व्यवस्था लागू करण्याचा कोणताही प्रयत्न झाल्यास परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होईल. तसेच हॉर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली होण्यास उशीर होईल आणि गेल्या दोन रात्री आपण पाहिले आहे त्याप्रमाणे तणाव आणखी वाढेल." असेही ते म्हणाले.

इस्रायलवर दबाव आणून लेबनॉनवरील हल्ले थांबवावेत. इराण आणि अमेरिकादरम्यान झालेल्या सामंजस्य करारातील (MOU) लेबनॉनशी संबंधित कलमांसह सर्व अटींचे पालन केले गेले पाहिजे. दुर्दैवाने इस्रायल लेबनॉनवर हवाई हल्ले करतच आहे. अशावेळी अमेरिकेने आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे" आणि इस्रायलला हल्ले थांबवण्यास तसेच लेबनॉनमधील व्याप्त भागातून माघार घेण्यास भाग पाडले पाहिजे, असे आवाहनही इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी केले.

अराघची यांनी खाडी देशांचा समावेश असलेल्या एका प्रादेशिक सुरक्षा फ्रेमवर्क (सुरक्षा यंत्रणा) स्थापन करण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले, "आपण अशा एका नवीन फ्रेमवर्कवर पोहोचले पाहिजे ज्यामध्ये या क्षेत्रातील सर्व देशांचा समावेश असेल आणि या क्षेत्राबाहेरील कोणत्याही देशाची उपस्थिती किंवा हस्तक्षेप नसेल." इराणच्या या भूमिकेमुळे जागतिक तेलपुरवठा आणि आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हॉर्मुझ सामुद्रधुनीतून जगातील मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाची वाहतूक होत असल्याने या घडामोडींवर जगभरातील देशांचे बारकाईने लक्ष आहे. दरम्यान, मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अनेक देशांनी संयम बाळगण्याचे आणि संवादातून तोडगा काढण्याचे आवाहन केले आहे.

### जॉर्डनकडून हल्ल्यांचा तीव्र निषेध

जॉर्डनने आज बहरीन आणि कुवेतला लक्ष्य करून इराणने केलेल्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांचा तीव्र निषेध केला. हे हल्ले या दोन्ही देशांच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन असून त्यांच्या सुरक्षा आणि स्थिरतेला धोका निर्माण करणारे आहेत, असे जॉर्डनने म्हटले आहे. जॉर्डनच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, अम्मान (जॉर्डनची राजधानी) बहरीन आणि कुवेतसोबत पूर्णपणे पाठीशी उभा आहे. तसेच आपले सार्वभौमत्व, सुरक्षा आणि जनतेच्या रक्षणासाठी या देशांनी उचललेल्या कोणत्याही पावलाला जॉर्डनचा पाठिंबा असेल.

## तृणमूलमधील अंतर्गत युद्ध पोलीस ठाण्यात; ऋतब्रत बॅनर्जींविरोधात तक्रार

**महाईन्यूज । पश्चिम बंगाल**

**तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत सत्तासंघर्ष आणखी तीव्र झाला आहे. खासदार डोला सेन यांनी पक्षाचे फुटीर नेते ऋतब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील बंडखोर गटाविरोधात पोलिसात अधिकृत तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत ऋतब्रत बॅनर्जी यांच्यावर फसवणूक, तृणमूल काँग्रेसच्या नावाने बनावट दस्तऐवज प्रसारित केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. डोला सेन यांनी कोलकाता येथील प्रगती मैदान आणि न्यू टाउन पोलीस ठाण्यात या तक्रारी नोंदवल्या आहेत.**





तृणमूलच्या खासदार डोला सेन यांनी बंडखोर गटाने कोलकाता महानगरपालिकेच्या माजी नगरसेवकांबरोबर बैठका घेताना पक्षाचे नाव, अधिकृत चिन्ह आणि ब्रँडिंगचा बेकायदेशीरपणे वापर केल्याचा आरोप त्यांनी तक्रारीतून केला आहे. या गंभीर प्रकरणाचा निष्पक्ष आणि सखोल तपास केला जावा. यासाठी इलेक्ट्रॉनिक आणि इतर पुरावे गोळा करण्यासाठी आवश्यक पावले उचलली जावीत, अशी विनंती त्यांनी केली आहे.

तृणमूलच्या बंडखोर गटाने आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या तयारीवर चर्चा करण्यासाठी कोलकाता येथे एका खासगी हॉलमध्ये बैठक घेतली. या बैठकीला ४७ माजी नगरसेवक उपस्थित होते. वॉर्ड पुनर्रचना पूर्ण झाल्यानंतर या वर्षाच्या अखेरीस कोलकाता महानगरपालिकेच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या बैठकीनंतर लगेचच डोला सेन यांनी तक्रार दाखल केली आहे. बंडखोरांवर टीका करताना खासदार महुआ मोइत्रा यांनी पक्षाचा जनाधार आजही ममता बॅनर्जी यांच्याशीच जोडलेला आहे, असे मत व्यक्त केले.

ममता बॅनर्जी यांनी स्वतः टीएमसीचे चिन्ह तयार केले होते. पक्षाला मिळणारा पाठिंबा त्यांच्या नेतृत्वामुळे मिळत आहे. काही नेत्यांनी पक्ष बदलला तरी ममता बॅनर्जी यांच्या पाठीशी असलेला २.६ कोटींहून अधिक मतदारांचा कौल आहे. तृणमूलच्या काही नगरसेवक, आमदार किंवा खासदारांनी पक्ष सोडल्याने तृणमूल समर्थनात घट होत नाही, असे मत महुआ मोइत्रा यांनी व्यक्त केले. दरम्यान, या तक्रारीनंतर तृणमूल काँग्रेसमधील सत्तासंघर्ष अधिक तीव्र झाला आहे.

# हुमा कुरेशी 'इश्क कमीना'च्या रिमेकमुळे ट्रोल



बॉलिवूडमध्ये जुन्या गाण्यांचा रिमेक करण्याचा नवा ट्रेंड सुरू आहे. याआधीही जुन्या गाजलेल्या एव्हरग्रीन गाण्यांचे रिमेक झाले आहेत. आता देखील अभिनेता शाहरुख खान आणि ऐश्वर्या राय यांच्या 'इश्क कमीना' या गाण्याचा रिमेक करण्यात आला आहे. 'बेबी डू डाई डू' या सिनेमात 'इश्क कमीना' गाण्याचं नवीन व्हर्जन प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. नुकतचं हे गाणं प्रदर्शित करण्यात आलं आहे. 'इश्क कमीना' गाण्यामध्ये हुमा आणि रचित सिंहची केमिस्ट्रीही पाहायला मिळत आहे. परंतु, 'इश्क कमीना' गाण्याचं हे नवीन व्हर्जन प्रेक्षकांना फारसं आवडलेलं नाही. चाहत्यांनी या गाण्याची तुलना जुन्या 'इश्क कमीना'सोबत केली आहे. अनेकांनी कमेंट करत या गाण्यावर नाराजी दर्शवली आहे. "बॉलिवूडला चांगली गाणी खराब करण्याची सवय आहे", "एवढं वाईट गाणं यांना स्वत:ला जाणीव होत नाही का", "शाहरुख-ऐश्वर्याची बरोबरी नाही करू शकतं", अशा कमेंट्स चाहत्यांनी केल्या आहेत. 'इश्क कमीना' हे गाणं रेमो डिसुजाने कोरिओग्राफ केलं आहे. तर नचिकेत सामंतने 'बेबी डू डाई डू' या सिनेमाचं दिग्दर्शन केलं आहे. या सिनेमात हुमा कुरेशी, सिकंदर खेर, चंकी पांडे, रचित सिंह, विद्या मालवदे, हिमांशु मलिक हे कलाकार दिसणार आहेत. येत्या ३ जुलैला सिनेमा प्रदर्शित होणार आहे.



# दुसऱ्या आठवड्यातही बॉक्स ऑफिसवर पकड कायम!

शाहिद कपूर, कृती सेनन आणि रश्मिका मंदाना यांची प्रमुख भूमिका असलेला 'कॉकटेल 2' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी करत आहे. १९ जून रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने पहिल्याच दिवसापासून प्रेक्षकांची पसंती मिळवत जोरदार कमाई केली. मात्र, प्रदर्शनाच्या दुसऱ्या आठवड्यात चित्रपटाच्या कमाईचा वेग काहीसा मंदावल्याचे दिसत आहे. बॉक्स ऑफिस ट्रॅकर सॅकनिल्कच्या अर्ली ट्रेंडनुसार, चित्रपटाने नवव्या दिवशी (शनिवारी) ४.२५ कोटी रुपयांची कमाई केली. यानंतर भारतातील एकूण कलेक्शन ७८.७५ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. तर, जगभरात या चित्रपटाने १२०.७२ कोटी रुपयांचा गल्ला जमवत १०० कोटींचा टप्पा सहज पार केला आहे. 'कॉकटेल 2'ने पहिल्या दिवशी १३.५० कोटी, दुसऱ्या दिवशी १६.२५ कोटी आणि तिसऱ्या दिवशी १७.७५ कोटी रुपयांची दमदार कमाई केली होती. त्यानंतर चौथ्या आणि पाचव्या दिवशी ६.७५ कोटी, सहाव्या दिवशी ५.२५ कोटी, सातव्या दिवशी ४.२५ कोटी आणि आठव्या दिवशी ४ कोटी रुपये कलेक्शन नोंदवले. दरम्यान, अक्षय कुमारचा 'वेलकम टू द जंगल' चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर 'कॉकटेल 2'च्या कमाईवर त्याचा परिणाम होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. सध्या तरी तसे चित्र दिसत नाही. आता रविवारी चित्रपटाच्या कमाईत किती वाढ होते, याकडे ट्रेड विश्लेषक आणि प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे. या कमाईसह 'कॉकटेल 2'ने 2012 मध्ये प्रदर्शित झालेल्या सैफ अली खान, दीपिका पदुकोण आणि डायना पेंटी यांच्या 'कॉकटेल' चित्रपटाचा पहिल्या दिवसाच्या कमाईचा विक्रमही मोडला आहे.



# राणी-ऐश्वर्या यांच्यात कशामुळे बिनसलं?



बॉलिवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय आणि राणी मुखर्जी यांची एकेकाळी अतूट मैत्री होती. दोघींची जोडी इंडस्ट्रीत चर्चेचा विषय होती. मात्र, पुढे एका चित्रपटामुळे त्यांच्या नात्यात दुरावा निर्माण झाला. पण ही मैत्री नेमकी कशी मोडली त्याला काय कारण होतं, याचा एक किस्सा सध्या चर्चेत आहे. एका जुन्या मुलाखतीत ऐश्वर्या रायने तिच्या खुलासा केला होता. तिच्या म्हणण्यानुसार, एका आंतरराष्ट्रीय वर्ल्ड टूरदरम्यान दोघी जवळ आल्या. जवळपास ४५ दिवस त्या एकत्र प्रवास करत होत्या, विविध देशांत स्टेज शो सादर करत होत्या आणि त्यावेळी त्यांच्या कुटुंबीयांचाही सहवास होता. याच काळात त्यांची मैत्री अधिक घट्ट झाली. ऐश्वर्याने राणीच्या स्वभावाचे कौतुक करत तिला मनमोकळी आणि दिलखुलास व्यक्ती म्हटले होते. तसेच, चित्रपटसृष्टीत काम करणाऱ्या दोन अभिनेत्री कधीच चांगल्या मैत्रिणी होऊ शकत नाहीत, हा समज चुकीचा असल्याचेही तिने स्पष्ट केले होते.

# मेस्सीचा आणखी एक ऐतिहासिक विक्रम

## विश्वचषकात सलग सात सामन्यांत गोल करणारा पहिला खेळाडू

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सीने फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेत आणखी एका ऐतिहासिक विक्रमावर आपले नाव कोरले आहे. जॉर्डनविरुद्धच्या गट साखळीतील अखेरच्या सामन्यात गोल करत मेस्सी विश्वचषकाच्या इतिहासात सलग सात सामन्यांत गोल करणारा पहिला फुटबॉलपटू ठरला.**





३९ वर्षीय मेस्सीला या सामन्यात सुरुवातीला विश्रांती देण्यात आली होती. मात्र, अखेरच्या २० मिनिटांत मैदानात उतरलेल्या मेस्सीने गोल करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले आणि नवा इतिहास रचला.

या सामन्यात अर्जेंटिनाने जॉर्डनचा ३-१ असा पराभव करत गट साखळीतील विजयी घोडदौड कायम राखली. पहिल्या सत्रात जॉर्डनने अर्जेंटिनाला चांगली झुंज दिली. मात्र, दुसऱ्या सत्रात अर्जेंटिनाने आक्रमक खेळ करत सामन्यावर संपूर्ण वर्चस्व गाजवले. या विजयासह अर्जेंटिनाने गटात अव्वल स्थान पटकावत बाद फेरीत दिमाखदार प्रवेश केला.

मेस्सीच्या गोलमुळे त्याच्या विश्वचषकातील एकूण गोलसंख्येने १९चा टप्पा गाठला आहे. यंदाच्या स्पर्धेत त्याने तीन सामन्यांत एकूण सहा गोलांची नोंद केली असून, स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूंच्या शर्यतीतही त्याने आपला दावा अधिक मजबूत केला आहे.

विश्वचषकाच्या इतिहासात सलग सात सामन्यांत गोल करण्याचा पराक्रम यापूर्वी कोणत्याही खेळाडूला करता आला नव्हता. वयाच्या ३९व्या वर्षीही मेस्सीची सातत्यपूर्ण कामगिरी आणि गोल करण्याची क्षमता कायम असल्याचे त्याने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. त्यामुळे अर्जेंटिनाच्या विश्वचषक मोहिमेला नवी उभारी मिळाली असून, बाद फेरीतही संघाकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.

# विश्वचषकात भावूक क्षण; न्यूझीलंडच्या तीन दिग्गजांची निवृत्ती




**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महिला टी-२० विश्वचषकाच्या गट टप्प्यातील अखेरच्या सामन्यानंतर न्यूझीलंडच्या तीन दिग्गज क्रिकेटपटू – सोफी डिव्हाइन, सुझी बेट्स आणि ली ताहूहू यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केला. इंग्लंडविरुद्धच्या सामन्यानंतर दोन्ही संघांच्या खेळाडू आणि सपोर्ट स्टाफने गार्ड ऑफ ऑनर देत या तिघींना भावपूर्ण निरोप दिला.**

लंडनच्या द ओव्हल मैदानावर झालेल्या सामन्यात इंग्लंडने न्यूझीलंडचा नऊ गडी राखून पराभव करत त्यांच्या विश्वचषकातील मोहिमेचा शेवट केला. मात्र, या पराभवापेक्षा तीन दिग्गज खेळाडूंच्या निवृत्तीचा क्षण अधिक भावूक ठरला.

या स्पर्धेपूर्वीच सोफी डिव्हाइन, सुझी बेट्स आणि ली ताहूहू यांनी निवृत्तीची घोषणा केली होती. न्यूझीलंड महिला क्रिकेटला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देण्यात या तिघींचा मोठा वाटा राहिला आहे.

सुझी बेट्सने ३७० आंतरराष्ट्रीय सामन्यांत १०,७२१ धावा करत न्यूझीलंडच्या इतिहासातील सर्वाधिक धावा करणारी आणि सर्वाधिक सामने खेळणारी महिला क्रिकेटपटू म्हणून कारकीर्द संपवली. अष्टपैलू सोफी डिव्हाइनने ३१७ सामन्यांत ८ हजारांहून अधिक धावा आणि २४१ बळी घेत संघासाठी अनेक संस्मरणीय विजय मिळवून दिले. तर वेगवान गोलंदाज ली ताहूहूने २०७ आंतरराष्ट्रीय सामन्यांत २२५ बळी घेत न्यूझीलंडच्या गोलंदाजीचे नेतृत्व केले.

सामन्यात प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने २० षटकांत ६ बाद १६३ धावा केल्या. कर्णधार अमेलिया केरने ४२ धावांचे योगदान दिले, तर आपल्या अखेरच्या आंतरराष्ट्रीय सामन्यात सोफी डिव्हाइनने अवघ्या १४ चेंडूत ३० धावांची आक्रमक खेळी केली. सुझी बेट्सने १९ धावा केल्या. मात्र, इंग्लंडने हे लक्ष्य सहज गाठत नऊ गडी राखून विजय मिळवला.

सामन्यानंतर दोन्ही संघांचे खेळाडू आणि सपोर्ट स्टाफ मैदानावर एकत्र आले. गार्ड ऑफ ऑनर आणि प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या कडकडाटात डिव्हाइन, बेट्स आणि ताहूहू यांना निरोप देण्यात आला. न्यूझीलंड महिला क्रिकेटच्या सुवर्णयुगाला यानिमित्ताने भावपूर्ण पूर्णविराम मिळाला.

### सुवर्ण कारकिर्दीचा गौरव

सुझी बेट्सने ३७० सामन्यांत १०,७२१ धावा करत न्यूझीलंडची सर्वाधिक धावा करणारी खेळाडू म्हणून निवृत्ती घेतली. सोफी डिव्हाइनने ३१७ सामन्यांत ८ हजारांहून अधिक धावा आणि २४१ बळी घेत अष्टपैलू म्हणून ठसा उमटवला, तर ली ताहूहूने २०७ सामन्यांत २२५ बळी घेत किवी गोलंदाजीचे नेतृत्व केले. या तिन्ही दिग्गजांना विश्वचषकानंतर गार्ड ऑफ ऑनर देत भावपूर्ण निरोप देण्यात आला.

### न्यूझीलंडच्या तीन दिग्गजांची कारकीर्द

**सुझी बेट्स : फलंदाज**
३७० आंतरराष्ट्रीय सामने, १०,७२१ धावा; न्यूझीलंडच्या इतिहासातील सर्वाधिक धावा करणारी आणि सर्वाधिक सामने खेळणारी क्रिकेटपटू.

**सोफी डिव्हाइन : अष्टपैलू**
३१७ सामने, ८ हजारांहून अधिक धावा आणि २४१ बळी; न्यूझीलंडच्या सर्वात यशस्वी अष्टपैलू खेळाडूंमध्ये गणना.

**ली ताहूहू : वेगवान गोलंदाज**
२०७ आंतरराष्ट्रीय सामने आणि २२५ बळी; किवी गोलंदाजीची प्रमुख आधारस्तंभ.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। सोमवार ।
दि. 29 जून 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# महापालिकेतील भ्रष्टाचाराचा 'व्हायरस' कायम!

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) वारंवार होणाऱ्या कारवायांनंतरही भ्रष्टाचाराचे प्रकार थांबण्याचे नाव घेत नसल्याचे चित्र आहे. २०१७ ते २०२६ या नऊ वर्षांच्या कालावधीत महापालिकेच्या विविध विभागांतील तब्बल २१ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना लाच घेताना एसीबीने रंगेहाथ पकडले आहे. त्यामुळे महापालिकेच्या कारभारातील पारदर्शकता आणि अंतर्गत नियंत्रण व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

एसीबीच्या आकडेवारीनुसार महापालिकेतील शिक्षण, आरोग्य, लेखा, करसंकलन, अग्निशमन, नगरसचिव, नगररचना (टाऊन प्लॅनिंग), पाणीपुरवठा, उद्यान, पर्यावरण आणि बांधकाम परवानगी यांसारख्या नागरिकांशी थेट संबंधित विभागांमध्ये लाचखोरीची प्रकरणे उघडकीस आली आहेत. बांधकाम परवानगी, कर आकारणी, दाखले, प्रशासकीय मंजुरी तसेच विविध शासकीय कामांसाठी लाखो रुपयांच्या लाचेची मागणी झाल्याचे कारवायांमधून समोर आले आहे.

या कारवायांमध्ये केवळ कनिष्ठ कर्मचारीच नव्हे, तर वर्ग-१ आणि वर्ग-२ मधील वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याने पालिका वर्तुळात खळबळ उडाली आहे. तक्रारदारांनी धाडसाने पुढे येत एसीबीकडे तक्रारी केल्यानंतर सापळे रचून संबंधितांना रंगेहाथ पकडण्यात आले. २०१७ मध्ये शिक्षण विभागातील प्रभारी शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, वैद्यकीय अधिकारी आणि लेखाधिकारी यांच्यावर कारवाई झाली होती. त्यानंतर करसंकलन, अग्निशमन, नगरसचिव, नगररचना, पाणीपुरवठा, उद्यान आणि पर्यावरण विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांवरही एसीबीने कारवाई केली. २०२५ मध्ये सांगवी करसंकलन कार्यालयातील मीटर निरीक्षक आणि पर्यावरण विभागातील कनिष्ठ अभियंता यांच्यावरही लाचखोरीप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले.


## लाचखोरीचे धक्कादायक चित्र

२०१७ ते २०२६ या नऊ वर्षांत पिंपरी-चिंचवड महापालिकेतील २१ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना लाच घेताना एसीबीने रंगेहाथ पकडले आहे. शिक्षण, आरोग्य, करसंकलन, नगररचना, नगरसचिव, पाणीपुरवठा, उद्यान, पर्यावरण, अग्निशमन आणि बांधकाम परवानगी यांसारख्या नागरिकांशी थेट संबंधित विभागांमध्ये कारवाया झाल्या आहेत. वारंवार होणाऱ्या एसीबीच्या सापळ्यांनंतरही लाचखोरीच्या तक्रारी कायम असल्याने महापालिकेच्या अंतर्गत नियंत्रण व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

काही आरोपी अधिकारी सेवानिवृत्त झाले असून काही अद्याप सेवेत आहेत. अनेक प्रकरणांमध्ये विभागीय चौकशी आणि न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे. मात्र, वारंवार होणाऱ्या कारवायांनंतरही भ्रष्टाचाराच्या तक्रारी कमी होत नसल्याने प्रशासनाच्या अंतर्गत नियंत्रण यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. महापालिकेने ऑनलाइन सेवा आणि ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून पारदर्शकता वाढविण्याचा प्रयत्न केला असला, तरी प्रत्यक्षात टेबलाखालून सुरू असलेली लाचखोरी थांबलेली नसल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी दोषींवर कठोर कारवाई, विभागीय जबाबदारी निश्चित करणे आणि अधिक प्रभावी नियंत्रण व्यवस्था उभारण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026




DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.

UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# पिंपरी-निगडी मेट्रो विस्ताराला मोठा वेग!

## भक्ती-शक्ती चौकातील चौथ्या स्थानकासाठी महापालिकेकडून २५ कोटी मंजूर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**महामेट्रोच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या पिंपरी ते निगडी या विस्तारित मेट्रो मार्गिकेवरील अतिरिक्त चौथ्या स्थानकाचा (स्टेशन) मार्ग अखेर मोकळा झाला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या (PCMC) स्थायी समितीच्या बैठकीत या बहुप्रतीक्षित चौथ्या स्थानकासाठी आवश्यक असलेल्या २५ कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीला अंतिम मंजुरी देण्यात आली. वास्तविक पाहता, मेट्रोच्या कामांमुळे पिंपरी ते निगडी दरम्यानच्या मुख्य रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली होती.**




जोपर्यंत महामेट्रो या भागातील खराब झालेले रस्ते दुरुस्त करत नाही, तोपर्यंत अतिरिक्त निधी मंजूर केला जाणार नाही, अशी आक्रमक भूमिका स्थायी समितीने घेतली होती. रस्त्यांच्या याच वादामुळे मे महिन्यात ही मंजुरी दोन वेळा तहकूब करण्यात आली होती. मात्र, महापालिका प्रशासन आणि महामेट्रोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमधील सकारात्मक समन्वयानंतर आणि रस्त्यांच्या दुरुस्तीचे आश्वासन मिळाल्यानंतर अखेर या निधीवर मंजुरीची मोहोर उमटली आहे.

पुणे मेट्रो फेज-१ अंतर्गत पिंपरी ते निगडी दरम्यान साडेचार किलोमीटरची उन्नत (एलिव्हेटेड) मार्गिका तयार केली जात आहे. या प्रकल्पात आधी चिंचवड, आकुर्डी आणि निगडी येथील भक्ती-शक्ती चौक अशी तीनच स्थानके नियोजित होती. परंतु, निगडी परिसरातील प्रवाशांची वाढती संख्या आणि नागरिकांची मागणी विचारात घेऊन केंद्र सरकारने भक्ती-शक्ती चौकात अतिरिक्त चौथ्या स्थानकास मंजुरी दिली.

या अतिरिक्त स्थानकामुळे प्रकल्पाचा मूळ खर्च ९१० कोटींवरून ९६०.१८ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. वाढीव ५० कोटी रुपयांपैकी २५ कोटी रुपये राज्य सरकारच्या नागरी परिवहन निधीतून, तर उर्वरित २५ कोटी रुपये पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून दिले जाणार आहेत. ऑक्टोबर २०२३ मध्ये मान्यता मिळालेल्या या प्रकल्पाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून, महापालिकेने स्वतःचा वाटा मंजूर केल्यामुळे आता या चौथ्या स्थानकाच्या प्रत्यक्ष कामाला मोठी गती मिळणार आहे. यामुळे निगडी परिसरातील नोकरदार, विद्यार्थी आणि नियमित प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे.


# रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांकडून ३ पिस्तुले व २ जिवंत काडतुसे जप्त

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अवैध शस्त्रांविरोधात सुरू असलेल्या विशेष 'आर्म ड्राईव्ह' मोहिमेदरम्यान गुन्हे शाखा युनिट-२ ने मोठी कारवाई करत दोन सराईत आरोपींकडून तीन पिस्तुले आणि दोन जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. या कारवाईमुळे अवैध शस्त्र तस्करी आणि गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यात पोलिसांना महत्त्वाचे यश मिळाले आहे.**




### कारवाईचा संक्षिप्त तपशील:



जप्त मुद्देमाल: ३ अवैध पिस्तुले आणि २ जिवंत काडतुसे

ताब्यात घेतलेले आरोपी: २ सराईत गुन्हेगार (आर्यन प्रकाश जाधव आणि ओमकार सचिन मोरे)

दाखल गुन्हा: आर्म्स ॲक्ट (शस्त्र कायदा) अंतर्गत गुन्हा दाखल

पुढील तपास: गुन्हे शाखा युनिट-२ कडून तपास सुरू

पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या आदेशानुसार अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या गुन्हेगारांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत गुन्हे शाखा युनिट-२ चे पथक माहिती संकलन करत असताना पोलीस शिपाई रवी पवार यांना त्यांच्या खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की, दोन रेकॉर्डवरील गुन्हेगार बावधन येथील चांदणी चौक परिसरात अवैध शस्त्रांसह येणार आहेत.

या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या नेतृत्वाखाली पथकाने सापळा रचून आर्यन प्रकाश जाधव (वय २०, रा. बावधन) आणि ओमकार सचिन मोरे (वय २३, रा. कोथरूड) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्या झडतीमध्ये तीन पिस्तुले आणि दोन जिवंत काडतुसे आढळून आली. पोलिसांनी तत्काळ शस्त्रसाठा जप्त करून दोघांविरुद्ध बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी ओमकार मोरे हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही आर्म्स ॲक्ट, अपहरण, मारहाण, दंगल आणि इतर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्याचा गुन्हेगारी इतिहास लक्षात घेता या कारवाईला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या प्रकरणी बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २६६/२०२६ अन्वये आर्म्स ॲक्ट कलम ३(२५) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास गुन्हे शाखा युनिट-२ करत आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, अपर पोलीस आयुक्त बसवराज तेली व सारंग आवाड, पोलीस उपायुक्त (गुन्हे) रोहिदास पवार आणि सहायक पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# ‘अप्पू घर’चा चेहरामोहरा बदलणार

## आधुनिक सुविधांसह पर्यटकांचे होणार स्वागत; स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील अत्यंत लोकप्रिय पर्यटन स्थळ असलेल्या ‘अप्पू घरा’चा लवकरच कायापालट करण्यावर आमचा भर असणार आहे. काळाची गरज ओळखून या ठिकाणी आधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. अप्पू घराच्या आधुनिकीकरणाचा मानस स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी व्यक्त केला आहे.**




या संदर्भात माहिती देताना सभापती अभिषेक बारणे म्हणाले की, “अप्पू घर हे सर्वसामान्यांसाठी पर्यटनाचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. सध्याच्या महागड्या अम्युझमेंट पार्क्सच्या तुलनेत अप्पू घराचे तिकीट दर अत्यंत कमी आहेत. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून या ठिकाणी विशेष बदल झाले नव्हते. आता तेथील राईड्स आणि सुखसोयींचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे.”

अप्पू घरासाठी २०३१ पर्यंत संबंधित कंत्राटदारावर करार करण्यात आला आहे. यामध्ये वॉटर पार्क आणि इतर नाविन्यपूर्ण प्रकल्पांचा समावेश आहे. सध्याच्या



कामांचा आढावा घेताना बारणे म्हणाले की, “या प्रकल्पासाठी उपलब्ध असलेल्या निधीतून ऑक्टोबरपर्यंतची कामे वेगाने पूर्ण केली जातील. कामाचा दर्जा उत्तम असावा आणि पर्यटकांना एक दर्जेदार अनुभव मिळावा, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.” अप्पू घराला पुनर्जीवित करून त्याला पुन्हा एकदा शहराचे ‘दिमाखदार’ आकर्षण म्हणून विकसित करण्याचा संकल्प सभापतींनी यावेळी व्यक्त केला.

### आधुनिकीकरण करताना सर्वसामान्यांचा विचार

अप्पू घराच्या विकासकामांबाबत बोलताना बारणे यांनी स्पष्ट केले की, जरी सुविधा आधुनिक केल्या तरी त्याचे तिकीट दर सर्वसामान्यांच्या खिशाला परवडतील, अशाच प्रकारे ठेवले जातील. कामगारांच्या शहरात सामान्य नागरिकांना आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, यासाठी हे दर मर्यादित ठेवण्यावर महापालिकेचा भर असेल.

# देशभरात सहावे स्थान मिळवून 'डीपीयू'ने राष्ट्रीय स्तरावर उमटवला ठसा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शिक्षण आणि शाश्वत विकासाच्या क्षेत्रात पुण्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाने (अभिमत विद्यापीठ) प्रतिष्ठित अशा ‘टाइम्स हायर एज्युकेशन सस्टेनेबिलिटी इम्पॅक्ट रँकिंग २०२६’ (TIMES HIGHER EDUCATION SUSTAINABILITY IMPACT RATINGS 2026) मध्ये ८३.९ च्या उत्कृष्ट एकूण गुणांसह (OVERALL SCORE) देशात ६ वे आणि जागतिक स्तरावर १०१ ते २०० च्या श्रेणीत स्थान मिळवून ऐतिहासिक कामगिरी केली आहे.**




संयुक्त राष्ट्रांच्या (UN) शाश्वत विकास उद्दिष्टांची (SDGs) पूर्तता करण्याच्या निकषांवर हे जागतिक मानांकन जाहीर केले जाते. यामध्ये विद्यापीठाने आरोग्य, शून्य उपासमार आणि पाणी व्यवस्थापनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

डॉ. पी. डी. पाटील (कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे): म्हणाले "टाइम्स हायर एज्युकेशनच्या जागतिक क्रमवारीत मिळालेले हे यश आमच्या संपूर्ण विद्यापीठ परिवाराच्या कठोर परिश्रमांचे आणि दूरदृष्टीचे फलित आहे. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच जागतिक शाश्वत विकासासाठी (Sustainability) योगदान देणे हे आमचे कर्तव्य आहे. हे मानांकन सामाजिक कल्याणासाठी कटिबद्ध राहण्याची आमची प्रेरणा अधिक दृढ करते."

सौ. डॉ. भाग्यश्रीताई पी. पाटील (प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे): म्हणाल्या "आरोग्य, पाणी व्यवस्थापन आणि शून्य उपासमार सारख्या महत्त्वपूर्ण जागतिक उद्दिष्टांमध्ये जगातील सर्वोत्तम संस्थांमध्ये स्थान मिळवणे ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. हे यश आंतरराष्ट्रीय स्तरावर आमचा शैक्षणिक आणि सामाजिक दर्जा सिद्ध करते."

हा अभूतपूर्व आणि ऐतिहासिक टप्पा डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे चे कुलपती डॉ. पी. डी. पाटील आणि प्र-कुलपती सौ. डॉ. भाग्यश्रीताई पी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व अखंड पाठबळामुळे साध्य झाला आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांचे मार्गदर्शन, प्र-कुलगुरू डॉ. स्मिता जाधव यांचे गतिमान व कुशल नेतृत्व, तसेच डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणे चे विश्वस्त व खजिनदार डॉ. यशराज पी. पाटील यांच्या निरंतर प्रोत्साहनामुळे आणि पाठिंब्यामुळे या यशाला अधिक बळ मिळाले आहे. त्यांचे दूरदर्शी नेतृत्व, धोरणात्मक दिशा आणि शैक्षणिक उत्कृष्टता, संशोधन, नाविन्यता (इनोव्हेशन) व शाश्वत विकासाप्रती असलेली दृढ कटिबद्धता; यांमुळेच जगातील अग्रगण्य विद्यापीठांमध्ये 'डीपीयू'चे (DPU) स्थान मजबूत करण्यात अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

### शाश्वत विकास उद्दिष्टांमधील (SDG) महत्त्वपूर्ण कामगिरी:

- SDG 3 - उत्तम आरोग्य आणि कल्याण (GOOD HEALTH AND WELL-BEING): वैद्यकीय क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत विद्यापीठाला देशात ४ था आणि जागतिक स्तरावर ३४ वा अत्यंत मानाचा क्रमांक मिळाला आहे. गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा आणि वैद्यकीय संशोधनातील विद्यापीठाचे हे यश उल्लेखनीय आहे.
- SDG 2 - शून्य उपासमार (ZERO HUNGER): कुपोषण निर्मूलन, अन्न सुरक्षा आणि अन्न बचतीच्या प्रयत्नांमध्ये विद्यापीठाने देशात ७ वे तर जगात ५२ वे स्थान पटकावले आहे.
- SDG 6 - स्वच्छ पाणी आणि स्वच्छता (CLEAN WATER AND SANITATION): पाणी संवर्धन आणि स्वच्छतेच्या बाबतीत विद्यापीठाने देशात ११ व्या स्थानावर, तर जागतिक स्तरावर १०१ ते २०० च्या श्रेणीत बाजी मारली आहे.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station